# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 June 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ जून २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- अहमदाबाद विमान अपघाताच्या मलब्यातून ब्लॅक बॉक्स सापडला-यापुढे बोईंगच्या प्रत्येक विमानाची प्रत्येक उड्डाणापूर्वी चाचणी बंधनकारक
- पंतप्रधानांकडून अपघातातल्या जखमींची विचारपूस-ओळख पटलेले मृतदेह कुटुंबीयांकडे सुपूर्द
- आगामी काळात हरित ऊर्जा विकासावर भर देण्याची आवश्यकता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून व्यक्त
- शासकीय अनुदान वाटपात अपहार प्रकरणी जालना जिल्ह्यात दहा तलाठी निलंबित
- लातूर जिल्ह्यात घोड्यांमध्ये ग्लँडर्स या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव

आणि

- जालना मुंबई वंदे भारत रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार करण्यास रेल्वे मंत्रालयाची मान्यता

****

अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या मलब्यातून विमानाचा ब्लॅक बॉक्स, डिजिटल फ्लाईट रेकॉर्डर तसंच डिजिटल ऑडिओ रेकॉर्डर सापडलं आहे. या अपघाताच्या चौकशीसाठी न्यायवैद्यकीय तज्ज्ञांचं पथकही घटनास्थळी दाखल झालं असून, अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाचं तपास पथकही या अपघाताच्या चौकशीसाठी भारतात दाखल होणार आहे. या अपघातानंतर नागरी उड्डाण महासंचालनालयानं जेएनएक्स इंजीन असलेल्या बोईंग ड्रीमलायनर प्रत्येक विमानाची प्रत्येक उड्डाणापूर्वी चाचणी करणं बंधनकारक केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अहमदाबाद इथं घटनास्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसंच या अपघातात जखमी झालेल्यांची सरकारी रुग्णालयात जाऊन भेट घेतली. अपघातातून आश्चर्यकारकरित्या बचावलेले प्रवासी रमेश विश्वासकुमार यांच्याशी पंतप्रधानांनी संवाद साधला. रमेश यांनी आपला अनुभव या शब्दांत कथन केला...

**बाईट – रमेश विश्वासकुमार**

गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कुटुंबाची पंतप्रधानांनी भेट घेऊन, त्यांचं सांत्वन केलं.

दरम्यान, या अपघातस्थळाच्या परिसरातल्या अनेक रहिवाशांचा शोध अद्याप सुरू आहे. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या मृतदेहांची डीएनएच्या मदतीने ओळख पटवण्याचं काम सुरू असून, आतापर्यंत ओळख पटलेले सात मृतदेह त्यांच्या कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

या अपघातात वैद्यकीय अभ्यासक्रमाचे चार विद्यार्थी तसंच एका डॉक्टरांच्या पत्नीचा मृत्यू झाला, ४५ विद्यार्थ्यांना वाचवण्यात यश आल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. सध्या ३२ जणांवर उपचार सुरू असून काही रुग्ण वगळता अन्य सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी दिली, ते म्हणाले...

**बाईट – डॉ. राकेश जोशी**

****

आगामी काळात हरित ऊर्जा विकासावर भर देण्याची आवश्यकता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. ते काल मुंबईत आढावा बैठकीत बोलत होते. ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कालबध्द नियोजन करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना दिल्या.

****

नागपुरात सुमारे आठ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती कारखाना उभारण्यात येणार आहे. यासंदर्भात काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

****

राज्यात सर्व नदीकिनारी पूर नियंत्रणाच्या उपाययोजना करुन पूर रेषेबाबतची मार्गदर्शक तत्वे पुन्हा निश्चित करावीत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत, ते काल याबाबतच्या बैठकीत बोलत होते.

****

शीख धर्मियांचे नववे गुरु तेगबहादूरसिंग यांचा ३५० वा हौतात्म्य दिन आणि दहावे गुरु गोविंदसिंग यांच्या ३५० व्या गुरु-ता-गद्दी कार्यक्रमाचं आयोजन राज्यात नांदेड, नागपूर आणि मुंबई या ठिकाणी करण्यात येणार आहे. यासाठी शासन संपूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. हा कार्यक्रम नांदेड इथं १५ आणि १६ नोव्हेंबरला होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगरच्या पाणी पुरवठ्यासंदर्भात सर्व कामं विहित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत. पापळकर यांनी काल या कामाची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. या पाणीपुरवठा योजनेच्या सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे.

****

जालना जिल्ह्यात शासकीय अनुदान वाटपात सुमारे ३५ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दहा तलाठ्यांना निलंबित करण्यात आलं. २०२२-२४ या कालावधीत अंबड आणि घनसावंगी तालुक्यातल्या ५७ तलाठ्यांनी अनुदान वाटपाच्या याद्यांमध्ये अफरातफर केल्याचं चौकशी अहवालातून समोर आलं आहे. इतर तलाठ्यांकडून खुलासे मागवून दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचं जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्याच्या कंधार तालुक्यात धर्मापुरी तांडा इथं स्थानिक गुन्हे शाखेनं नऊ लाखांहून जास्त रुपयांचा १८२ किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

लातूर जिल्ह्यात घोड्यांमध्ये ग्लँडर्स या अत्यंत संसर्गजन्य आणि माणसांमध्येही पसरणाऱ्या रोगाचा प्रादुर्भाव आढळला आहे. संसर्ग झालेल्या एका घोड्याला जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शास्त्रशुद्ध पद्धतीने दयामरण देण्यात आलं. आणखी चार घोड्यांना संसर्ग झाल्याचा संशय आहे. यावर जिल्हा प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी सुरू केली आहे. बाधित क्षेत्राच्या पाच किलोमीटर परिसरातील सर्व घोड्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवले जात आहेत.

****

जालना मुंबई वंदे भारत रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार करण्यास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. त्यानुसार ही गाडी आता नांदेडहून दररोज पहाटे पाच वाजता, परभणीहून पाच-चाळीस, जालना सात-वीस, तर छत्रपती संभाजीनगरहून सकाळी सव्वा आठ वाजता सुटेल. परतीच्या प्रवासात ही गाडी मुंबईहून दुपारी एक वाजून दहा मिनिटांनी निघून सायंकाळी सात वाजून पाच मिनिटांनी छत्रपती संभाजीनगर, आठ वाजून पाच मिनिटांनी जालना, पावणे दहा वाजता परभणी तर रात्री दहा वाजून पन्नास मिनिटांनी नांदेडला पोहोचणार आहे.

****

जागतिक योग दिन येत्या २१ जून रोजी साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आकाशवाणी दररोज आपल्या श्रोत्यांसाठी एका आसनाविषयी माहिती देत आहे. आज आपण योगशिक्षक डॉ. प्रशांत देशमुख यांनी दिलेली भुजंगासनाविषयीची माहिती आपण जाणून घेऊ या...

**बाईट – डॉ. प्रशांत देशमुख**

****

परभणी जिल्ह्यात पूर्णा इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर काल योग शिबिर घेण्यात आलं. परिसरातून काल योग जनजागरण फेरीही काढण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातल्या बाळापूर ग्रामपंचायतीने वन नेशन वन इलेक्शनचा ठराव एकमतानं संमत केला आहे. सरपंच नीता सुनील गिऱ्हे यांनी याबाबत माहिती देत, इतर ग्रामपंचायतींनीही याबाबत ठराव घेण्याचं आवाहन केलं. असा ठराव घेणारी बाळापूर ही देशातली पहिलीच ग्रामपंचायत असल्याचा दावाही सरपंच गिऱ्हे यांनी केला आहे...

**बाईट – नीता सुनील गिऱ्हे, सरपंच**

****

नांदेड जिल्ह्याच्या धर्माबाद तालुक्यात सीमावर्ती करखेली गावात जलजीवन मिशनअंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना सुरू झाली आहे. या योजनेतून सुमारे आठ हजार लोकसंख्येला दररोज शुद्ध पेयजल पुरवठा होत आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शेंद्रा बिडकीन वळण रस्त्याचा सुधारित प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश राज्य मंत्री अतुल सावे यांनी दिले आहेत. ते काल या संदर्भातल्या बैठकीत बोलत होते. आगामी काळात उद्योग व्यवसायांचा संभाव्य विस्तार पाहता हे निर्देश देण्यात आल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

लातूर शहर महानगरपालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त म्हणून मानसी मीना यांनी काल पदभार स्वीकारला. लातूर महानगरपालिकेचा लौकिक वृद्धिंगत करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्वजण मिळून काम करू, असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

****

जर्मनीच्या म्यूनिच इथं झालेल्या नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या सुरुचि सिंह हिनं दहा मीटर एयर पिस्टल प्रकारात सुवर्ण पदक जिंकलं आहे. या स्पर्धेत सुरुचीनं सलग तिसऱ्यांदा सुवर्णवेध घेतला.

****

जालना तसंच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काल बहुतांश भागात पाऊस झाला. जालना जिल्ह्यात सलग तीन दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी कपाशी लागवडीसह पेरणीच्या कामांना सुरुवात केली आहे.

येत्या चोवीस तासांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

****